# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवार्थ समर्पिता

**दिनांक २० फ़ेब्रुवारी २००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक २०/०२/२००४ रोजी मा.महापौर सौ.रूख्मीणीबाई राधाकिसन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेची सर्वसाधारण सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दूपारी ३.४५ वाजता 'वंदेमातरम्' या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री.राधाकृष्ण गायकवाड
०३. स.स.श्री.वाणि ठकुजी रामसिंग
०४. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०५. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०६. स.स.श्री.शे.ईलियास किरमाणी शे.उमर
०७. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतु
०८. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
०९. स.स.श्री.कावडे साहेबराव राणूबा
१०. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
११. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१२. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१३. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१४. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१५. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१६. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१७. स.स.श्रीमती डॉ.आशा उत्तमराव बिनवडे
१८. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
१९. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२०. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२१. स.स.सौ.सुवर्णा उमेश चंद्रात्रे
२२. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२३. स.स.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
२४. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२५. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
२६. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड
२७. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
२८. स.स.श्री.मगरे सुनिल यादवराव
२९. स.स.श्री.अ.कादर अ.हाफिज
३०. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव

३१. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३२. स.स.श्री.महम्मद जावेद महम्मद इसहाक
३३. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३४. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
३५. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
३६. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
३७. स.स.श्री.फुलारी नंदकुमार माधवराव
३८. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
३९. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४०. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
४१. स.स.श्री.देसरडा प्रशांत सुभाष
४२. स.स.श्री.अ.कदिर मौलाना सय्यद
४३. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
४४. स.स.श्री.अशरफ मोतीवाला
४५. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
४६. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
४७. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
४८. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
४९. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५०. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५१. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५२. स.स.श्री.स.सलिम स.युसूफ़
५३. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५४. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
५५. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
५६. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
५७. स.स.श्री.अजिजखान गणीखान
५८. स.स.श्री.अफसरखान यासीनखान
५९. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६०. स.स.श्री.कैसरखान बद्रोद्दीनखान
६१. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
६२. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६३. स.स.सौ.बबिता सुभाष कागडा
६४. स.स.श्री.तनवाणि किशनचंद लेखराज
६५. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे
०२. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
०३. स.स.सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

**संवाद :**

मा.महापौर : सर्वांना विनंती करण्यांत येते की, कृपया सहकार्य करावे.

सौ.लिलावती घायतिलक : मी जो प्रश्न उपस्थित करणार त्याचा खुलासा प्रशासनाने देणे आवश्यक आहे. दि.०३/०१/२००४ रोजी माझ्या मुलाचा या महापालिकेची दैनिक वेतनाावर सेवा करीत असतांना मृत्यु झाला. त्या कुटूंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत ठराव पास झाला,त्या कुटूंबातील एका व्यक्तिला नोकरी द्यावी याबद्दल अनेक अर्ज दिलेले आहे. मी प्रशासनास पत्रही दिले आहे. अद्यापपर्यंत काहीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा. या घटनेला १ वर्ष २ महिने झाले यापूर्वी मृत्यु झालेल्यांच्या बरेच कुटूंबीयांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

श्री.भागवत कराड : स.सदस्या सौ.घायतिलक यांच्या मुलाचा या महापालिकेची सेवा करीत असतांना मृत्यु झाला.त्याबद्दल त्यांचे कुटूंबीयांना आर्थिक मदत देण्याबाबत व कुटूंबातील एक व्यक्ती यांना महापालिका सेवेत सामावून घेण्याबाबत दोनवेळा ठराव पारीत झालेला असतांना का कार्यवाही झालेली नाही असा त्यांचा प्रश्न आहे. एवढा उशीर का लागतो याचा सविस्तर खुलासा करावा. तसेच नुकतेच काही दिवसापूर्वी धोबी समाजाचे एका मुलाचा नाल्यात पडून मृत्यु झाला त्या मुंलाच्या कुटूंबीयांना सुध्दा आर्थिक मदत १०,०००/- देणे बाबत या सभागृहाने निर्णय घेतलेला असतांना अंमलबजावणी करण्यात आलेली नाही. तात्काळ अंमलबजावणी करावी.

उपआयुक्त (प्र.) : स.सदस्या यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात खुलासा असा आहे, सदर कर्मचारी हे दैनिक वेतनावर होते. व दैनिक वेतनावरील कर्मचारी मृत झाल्यामूळे अनुकंपावर त्यांचे जागी कुटूंबातील व्यक्तीला सेवेत घ्यावे असा ठराव पारीत झालेला होता त्या संदर्भात शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आलेले आहे. अद्यापपर्यंत शासनाकडून मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. त्यामूळे कुटूंबातील इतर व्यक्तीला त्यांचे जागेवर कामावर घेण्यांत आलेले नाही. आर्थिक मदत देण्याचा ठराव पारीत झालेला आहे. सविस्तर टिप्पणी तयार करून २-४ दिवसात या संदर्भात निर्णय घेतला जाईल.

सौ.लिलावती घायतिलक : मे महिन्यात ठराव पास झाला. जानेवारी महिन्यात घटना घडलेली होती. ४ महिने उशीर झाला. शासनाकडे या ठरावानूसार नोंव्हेबंर २००३ मध्ये मार्गदर्शन मागविण्यात आले याचा अर्थ ४-५ महिने प्रशासनाने दुर्लक्ष केले. जी माहिती मला देण्यात आली. त्यात असे नमूद केले की, कार्यवाही करीत आहोत. अनेकवेळा मी प्रशासनातील अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष भेट दिली. दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कुठल्याही सवलती दिल्या जात नाही. असे अधिकारी सांगतात. दैनिक वेतनावरील कर्मचारी हा मानव प्राणी नाही का? अनेक कर्मचारी या महापालिकेत १५-२० वर्षापासून सेवा करतात. त्यांना सेवेत कायम केले जात नाही याचे कारण काय. किती दिवस किती वर्ष दैनिक वेतनावरच काम करायचे असा प्रश्न निर्माण होतो. प्रशासनाने याची दखल घेवून तात्काळ अंमलबजावणी करावी.

मा.महापौर : सभागृहात ज्या भावना व्यक्त केल्या जात आहे, त्याचा सविस्तर खुलासा द्यावा व दखल घेण्यात यावी.

उपआयुक्त (प्र.) : सविस्तर अहवाल विशेष दुतामार्फ़त सोमवारी पाठवण्यात येईल. शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात येईल.

सौ.लिलावती घायतिलक : मृत्यु होवून १४ महिने झाले. त्यांचे जागेवर दुसऱ्या व्यक्तीला कामावर घेण्याबाबत विचार करण्यात येईल असे उत्तर देण्यांत येते. आतापर्यंत प्रशासनाबरोबर संयम बाळगून चर्चा केलेली होती. प्रतिसाद मिळालेला नाही. सन २००४ चा दूसरा महिना संपत आहे.

श्री.रतनकुमार पंडागळे : सेवेत घेणे संबंधी शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आले, ठिक आहे परंतू आर्थिक मदत देण्यासाठी का विलंब झालेला आहे. योग्य खुलासा देण्यांत यावा.

मा.आयुक्त : जानेवारी मध्ये ठराव झाला असल्यास आर्थिक मदत अद्याप दिली नाही. अयोग्य बाब आहे.

सौ.लिलावती घायतिलक : ज्या लोकांचे पाण्याच्या पाईप लाईन फुटल्या मूळे निर्जिव वस्तूचे नुकसान झाले त्यांना आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. जिवंत व्यक्तींचे निधन झाले त्यांचे कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यास टाळाटाळ होते. सजिवांपेक्षा निर्जिव वस्तूला जास्त महत्व प्रशासन देते.

मा.आयुक्त : दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना कोणत्याही सवलती दिल्या जात नाही. तरी सुध्दा नगर विकास विभागाचे सचिव यांना या संदर्भात वैयक्तिक रित्या विनंती केली. उप आयुक्तांनी सूचना केली की, त्यांनी उपसचिव नगरविकास विभाग यांचेशी संपर्क करून या संबंधी निर्णय घ्यावा. दुसरे प्रकरण आहे,आर्थिक मदत देण्याबाबत. सोमवारी दिली जाईल.

श्री.प्रकाश निकाळजे : प्राणी संग्रहालय या विभागात रतन म्हस्के नावाचे कर्मचारी कार्यरत असतांना त्यांचा मृत्यू झालेला होता त्यांचेही कुटुंबीयांना १०,०००/- आर्थिक मदत देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

श्री.साहेबराव कावडे : स.सदस्या श्रीमती घायतिलक यांचा मुलगा यांचा मनपाच्या सेवेत असतांना मृत्यू झाला त्यांनी यासंदर्भात मुलाच्या जागेवर त्यांची सून यांना कामावर घेण्याबाबत विनंती केलेली आहे. ठराव पास केलेला आहे. त्यानुसार कार्यवाही व्हावी तसे आदेश देण्यात यावे व त्यांना ताबडतोब १०,०००/- ची आर्थिक मदत देण्यात यावी.

मा.महापौर : या संदर्भात ताबडतोब कार्यवाही करावी.

श्री.रतनकुमार पंडागळे : शाळेतील मुलांना पिण्याचे पाणी नाही. रोटरी क्लब तर्फे योजना राबविण्याचा प्रस्ताव होता त्यावर चर्चा ही झालेली होती. तो प्रस्ताव मंजूर झालेला नव्हता व रद्दही झालेला नाही. पाण्याच्या बाबतीत नियोजन करण्यात यावे.

मा.आयुक्त : पाणी पुरवठ्याचे नियोजन कसे करावे. या संदर्भात सभागृहात चर्चा झाली होती. असा प्रकल्प रोटरी क्लब कसे राबवते ते पहावे. त्यांना काही सूचना करावयाच्या असतील ते करावे. रोटरी क्लब या संस्थेतर्फे ६६ शाळांना शुध्द पाणी देण्याचा प्रस्ताव होता. त्यावर चर्चा ही झालेली होती. ५०% खर्च महापालिके तर्फे होणार होता व ५०% खर्च रोटरी क्लब संस्था करणार होती. तो प्रस्ताव स्थगित ठेवण्यात आलेला होता. स.सदस्य ही जैस्वाल यांचे वॉर्डातील शाळेत रोटरी क्लबने पिण्याच्या पाण्याची करून दिलेली उपलब्धता लक्षात घेवून शिक्षणाधिकारी यांनी माहिती द्यावी व तसा प्रस्ताव सादर करून त्यावर चर्चा करून असे पाण्याच्या बाबतीत नियोजन करण्याबाबत यावर निर्णय घेण्यात यावा त्यांनंतर मार्ग काढता येईल.

मा.महापौर : शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा.

शिक्षणाधिकारी : सन २००३ मध्ये नोव्हेंबर महिन्यात सर्वसाधारण सभेत महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना पंप जल प्रकल्पाद्वारे ६६ शाळांना रोटरी क्लब औरंगाबाद व महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने फ़िल्टर केलेले जंतू विरहीत पाणीपुरवठ्याचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. प्रत्येक शाळेसाठी ३०,०००/- असा खर्च नमुद करण्यात आलेला होता.त्यावर चर्चा होवून स्थगिती देण्यात आलेली होती व प्रायोगिक तत्वावर एका शाळेवर तशी व्यवस्था करून पाहणी करून निर्णय घेण्यात येईल असे ठरलेले होते. खाजगी संस्थेची समता नगर प्राथमिक शाळा येथे रोटरी क्लब या संस्थेने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केलेली आहे. सध्या तेथे हा प्रकल्प चालू आहे. मनपाच्या शाळेत हा प्रकल्प राबवायचा झाल्यास अंडर ग्राऊन्ड स्टोरेज टँकसाठी ६०००/- रू.नळ आणि इतर साहित्य रू.४०००/- ओव्हर हेट टँक ८०००/- रू.पंप विजेचे कनेक्शन ५५००/- रू.वॉटर फ़िल्टन ५०००/- रू. इतर खर्च १५००/- असे एकूण ३०,०००/- एका शाळेसाठी खर्च येणार आहे. प्रकल्पाचा एकूण खर्च १९,८०,०००/- रू.इतका होणार असून मनपास ५०% प्रमाणे रू.०९,९०,०००/- खर्च येणार असून दोन वर्षात म्हणजे सन २००३-०४ या वर्षात रू.४,९५,०००/- रू.सन २००४-०५ या वर्षामध्ये रू.४,९५,०००/- खर्च करावा लागणार आहे. सभागृहाच्या मान्यतेसाठी पुढील बैठकीत प्रस्ताव सादर करण्यात येईल.

श्री.भगवान रगडे : नारेगांव शाळेला १५ वर्ष झाले तेव्हा पासून पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झालेली नाही. शाळेची भिंत तुटलेल्या अवस्थेत आहे. अनेक वेळा पत्र दिले. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झालेली नाही. मुले सध्या हात पंपाचे पाणी पितात ते पाणी दुषित असून आरोग्य धोक्यात येऊ शकते. अद्यापपर्यंत का पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झालेली नाही.

श्री.संजय सिरसाठ : रोटरी क्लब औरंगाबाद या संस्थेतर्फ़े शाळेतील मुलांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणार होतो तो स्थगीत केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

श्री.नंदकुमार फ़ुलारी : महानगरपालिके मार्फ़त शहरात पाणी पुरवठा होतो हे पाणी शुध्द नाही का ? इतर संस्थेने ही योजना राबविण्या ऐवजी मनपानेच राबवावी संपूर्ण शहराला पाणी पुरवठा होतो. शाळेतील विद्यार्थ्यांना पाणी पुरवठा मनपा करू शकते.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : महापालिके मार्फ़त दिले जाणारे पाणी शुध्द आहे या बद्दल दुमत नाही. हा चर्चेचा विषय आहे. पुढील बैठकात प्रस्ताव सादर करावा.

श्री.चंद्रशेखर जैस्वाल : सविस्तर असा प्रस्ताव यापूर्वी सादर केलेला नव्हता. त्यामुळे स.सदस्यांचा गैरसमज झालेला होता. प्रस्तावास मान्यता द्यावी व या वर्षापासून सदरचे काम सुरू करावे.

सौ.निखत परवीन : नोव्हेंबर २००३ च्या बैठकीत सादर केलेला प्रस्ताव मंजूरी दिली असती तर आज पर्यंत काही शाळांमध्ये पिण्याचा पाण्याचा प्रश्न मार्गी लागला असता चर्चा होत आहे ती झाली नसती. आजची परिस्थिती अशी की, खिचडी विद्यार्थ्यांना वाटप होते. परंतू पिण्यासाठी पाणी नाही. मुलांना पाणी पिण्यासाठी घरी जावे लागते. पाणी साठवण्यासाठी जागा नाही. महापालिकेच्या शाळांमध्ये गरीबांची मुले शिक्षण घेतात. गरीब जनतेच्या मुलांना पाणी उपलब्ध होईल. सादर केलेल्या त्या प्रस्तावास मान्यता देण्यात यावी.

श्री.रतनकुमार पंडागळे : यात ५०% खर्च महापालिकेचा राहील. फ़ायद्याचे आहे शाळेत मुलांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था होईल. कार्यवाही होत नाही, निषेध करण्यात येतो.

मा.महापौर : पुढील बैठकीत सविस्तर प्रस्ताव ठेवण्यात यावा.

श्री.सुनिल मगरे : गट क्र.६८,६९ ईटखेडा संदर्भात या सभागृहात सविस्तर अशी चर्चा होवून सहा.संचालक नगर रचना यांनी दिलेल्या ले आऊट मंजूरीस या सभागृहाने स्थगीती देवून समिती गठीत करण्यात आलेली होती. त्या समितीचा अहवाल प्राप्त झालेला आहे अशी माहिती मिळाली. त्या अहवालांमध्ये गंभीर असे आरोप ठेवण्यात आलेले असून सभागृहात अहवाल वाचून दाखविण्यात यावा अशी विनंती आहे.

नगर सचिव : मागील बैठकीच्या वेळीच मा.महापौरांकडे अहवाल सादर केलेला होता. त्यावेळी सभा संपविण्यात आली म्हणून हा अहवाल वाचण्यात आला नाही.

श्री.तकी हसन खॉन : ले-आऊट मंजूरी दिली दिलेली मंजूरी नियमानुसार बरोबर आहे. त्यास महाराष्ट्र शासनाने आदेशही दिलेला आहे.

मा.महापौर : नगर सचिव यांनी समितीने दिलेला अहवाल वाचून दाखवावा.

नगर सचिव : अहवाल वाचून दाखवतात. (प्रत सोबत जोडली आहे.)

श्री.सुनिल मगरे : आताच सचिव यांनी अहवाल वाचून दाखविला. त्या अहवालात चौकशी समितीने जे निष्कर्ष दिले ते विचारात घेतल्यास असे निदर्शनास येते की, सदरच्या ले-आऊट हा त्या विभागातील कर्मचाऱ्यांनी सर्व नियम बाजूला ठेवून मंजूरी दिलेली आहे. नियमांचे उल्लंघन केलेले आहे. या अहवालात काही अधिकाऱ्यांच्या नावाचा सुध्दा उल्लेख करण्यात आलेला आहे. जे निष्कर्ष समितीने काढलेले आहे. ते योग्य की अयोग्य याचा खुलासा सहा.संचालक नगर रचना यांनी करावा. निष्कर्ष बरोबर असतील तर नियम बाजूला ठेवून ले-आऊटला मंजूरी दिली असेल तर त्या अधिकाऱ्यावर कार्यवाही सुध्दा झाली पाहिजे. असे प्रकार नियमित या विभागाकडून होतात अनेक भूखंडाच्या संदर्भात प्रकरणे उघडकीस आलेली आहे. असे बेजबाबदार पणे अधिकारी काम करीत असेल तर त्यांना पाठीशी घालण्याचा प्रयत्न होवू नये.

श्री.तकी हसन खॉन : चौकशी अहवाल आला व तो शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे. शासनाकडून काय आले. शासनाचे म्हणणे आहे की, परवानगी देण्याचे सर्व अधिकार आयुक्तांना आहेत. ते त्यांनी केले. ते सोडून काही आले असेल तर ते सांगावे. सहा.संचालक नगर रचना यांनी खुलासा घ्यावा.

श्री.सुनिल मगरे : सर्व नियम बाजूला ठेवून गौडबंगाल करून अधिकाऱ्यांनी ले-आऊटला मंजूरी दिली त्यांचेवर कडक कार्यवाही करण्यात यावी.

श्री.तकी हसन खॉन : चौकशी समितीचा अहवाल शासनाकडे पाठविलेला आहे. शासनास त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार आहे. शासनाने काय निर्णय घेतला तो सभागृहासमोर आणावा. कोणाला विरोधात जायचे असेल तर त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या विरोधात जावे.

श्री.भगवान घडमोडे : आताच अहवाल वाचून दाखविला गंभीर असे आरोप समितीने ठेवलेले आहेत. त्यावर निर्णय घेण्याचा अधिकार या सर्वसाधारण सभेला आहे. सर्वोच्च पातळीवर निर्णय घेवू शकतो. दुसरी बाब नमूद करावीशी वाटते की, एखाद्या

सामान्य व्यक्तीला पिठाची गिरणी टाकावयाची असेल तर त्यासाठी ना हरकत प्रमाण पत्रासाठी त्या व्यक्तीला चकरा माराव्या लागतात. एन.ओ.सी. दिली जात नाही. व ले-आऊट मंजूरी देतांना सर्व नियम बाजूला ठेवून मंजूरी देणे चूकीचे आहे. त्या जागेवर कर्जाचा बोजा होता. स.सदस्यांना सभागृहाच्या वतीने नमूद करू इच्छितो की, स.सदस्यांनी जनतेचे हीत बघावे हेच आपले कर्तव्य आहे. कर्जाचा बोजा असतांना ले-आऊट मंजूरी दिली. प्लॉट घेणारे मध्यम,गरीब नागरिक खरेदीचे व्यवहार करतील व भविष्यात ते अडचणीत येतील . म्हणून या सभागृहात त्यावर चर्चा होवून स्थगिती देण्यात आलेली होती. त्यानंतरही प्लॉटींग पाडण्याचे काम चालू असेल व संबंधीत अधिकाऱ्यांवर कार्यवाही होणे आवश्यक आहे.

श्री.तकी हसन खॉन : शासनाचे या संदर्भात काय निर्देश आलेले आहेत ते सभागृहासमोर आणावे. त्यानंतरच कार्यवाही करता येईल. समितीच्या निर्णयावर निर्णय घेण्याचे अधिकार शासनास आहे. शासनाचे निर्देशा प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

श्री.प्रशांत देसरडा : चौकशी अहवाल आज सादर होतो आहे. सभागृहाने निर्णय घेण्याआधीच अहवाल शासनाकडे पाठविण्याची का गरज भासली. मा.आयुक्तांनी मत मांडावे. सभागृह सक्षम आहे. मा.आयुक्तांनी निर्णय घ्यावा.

श्री.भागवत कराड : शासनाच्या आदेशाची आवश्यकता नाही. समितीने अहवाल दिला त्यानुसार मा.आयुक्तांनी कार्यवाही करावी.

श्री.तकी हसन खॉन : शासनाचे निर्देश असतील तर प्रशासनाने खुलासा करावा. लपवून ठेवण्याची गरज नाही.

श्री.सुनिल मगरे : अनधिकृतपणे ले-आऊटला मंजूरी दिली. समितीने निष्कर्ष काढलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

मा.महापौर : सदरच्या ले -आऊटला स्थगिती देण्यात यावी. मा.आयुक्त यांनी या बाबतीत कडक कार्यवाही करावी. विषय क्र.१ वर चर्चा करावी.

श्री.तकी हसन खॉन : शासनाचा अहवाल का लपवण्यात येतो याचे उत्तर देण्यात यावे.

**विषय क्र. २९६/१:**

दिनांक ६.१.२००४ आणि दि.२०.१.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

सौ.निखत परवीन : इतिवृत्त दि.२०.१.२००४ मध्ये विषय क्र.२६१/३ मंजूर करण्यात आलेला आहे. त्यास माझा विरोध आहे. ऐनवेळचे सर्व विषय मंजूर असे म्हटले त्यात हा विषय घेतलेला आहे. नामंजूर करावा.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : स.सदस्या सौ.निखत परवीन यांनी विरोध नोंदविलेला आहे. त्यांचा विरोध नोंदवून घ्यावा.

मा.महापौर : स.सदस्या सौ.निखत परवीन यांचे आक्षेप नोंदवावे. विषय क्र.१ मंजूर करण्यात येतो.

**ठराव:**

दिनांक ६.१.२००४ आणि दि.२०.१.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यांस सर्वानुमते मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. २९७/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.एसएटी-३१९९/४३८३/(५५८/९९)/प्रशा-२दि.८/२/२००१ अन्वये, श्री.व्ही.एल.अतकुरकर यांची शिक्षणाधिकारी,औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण मंडळ औरंगाबाद या पदावर प्रथमत: एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आलेली होती, त्यांचा दि.१/८/२००१ पासून एक वर्षाचा कालावधी दि.३१/७/२००२ रोजी संपुष्टात आलेला आहे. तथापि शासन निर्णय क्र.एसएटी-३१०३/(प्र.क्र.१९४/२००३)/प्रशा-२,दि.२५जुलै२००३अन्वये,श्री.व्ही.एल.अतकुरकर यांचा प्रतिनियुक्तीचा कालावधी दि.१/८/२००२ पासून दोन वर्षाने वाढवून देण्यास शासनाने कार्योत्तर मान्यता दिलेली आहे.

शासन निर्णय वित्त विभाग,क्रमांक सीएसए-१०८५/८५३/सेवा-८ दि.१७/८/८५ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यांत आल्याचेही शासन निर्णयात नमुद करण्यात आलेले आहे.

करिता दि.२५ जुलै २००३ च्या शासन निर्णयानुसार श्री. व्ही.एल.अतकुरकर, यांचा दि.१/८/२००२ पासून दोन वर्षाचा (दि.३१/७/२००४ पर्यंत) प्रतिनियुक्तीचा कालावधी मान्य होणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.नंदकुमार घोडेले : नविन शिक्षणाधिकारी येत नाही तोपर्यंत विद्यमान शिक्षणाधिकारी यांना कार्यमुक्त करू नये.

श्री.कदीर मौलाना : गट क्र.६८,६९ च्या संदर्भात समितीने अहवाल दिला शासनाकडे पाठविला शासनाचे काय निर्देश आले सभागृहात वाचून दाखवावे. आलेले नसेल तर तसा खुलासा करावा.

मा.महापौर : शासनाकडे गट क्र.६८,६९ च्या संदर्भात पत्र आले असेल तर त्याची झेरॉक्स सर्व स.सदस्यांना देण्यात यावी. सर्वांनी आपआपल्या जागेवर बसावे. विषय पत्रिकेवरील विषय संपल्यानंतर शासनाकडून आलेले पत्र सभागृहात वाचून दाखविण्यात यावे. आता विषय क्र.२ वर चर्चा करावी. विषय क्र.२ बद्दल मा.आयुक्त खुलासा करतील.

मा.आयुक्त : उपशिक्षणाधिकारी परभणी, श्री.देशमुख यांच्या बदलीचे आदेश या महापालिकेस प्राप्त झालेले आहे, ते मला प्रत्यक्ष भेटले आहे ते रूजू होतील त्यांनंतर सभागृहाची परवानगी असल्यास कार्यरत शिक्षणाधिकारी यांना कार्यमुक्त करण्यात येईल.

सौ.निखत परवीन : विद्यमान शिक्षणाधिकारी नांदेडचे रहिवासी आहेत.नविन शिक्षणाधिकारी परभणीचे येणार आहे. जाण्या येण्यात वेळ जातो. एकाही शाळेवर असे अधिकारी भेट देत नाही. शहरातील रहिवासी असलेले अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी.

मा.आयुक्त : स्थानिक अधिकारी आवश्यक असेल तर ठराव करावा तोही शासनाकडे पाठविला जाईल.

मा.महापौर : नविन शिक्षणाधिकारी यांना रूजू करून घेण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व सभागृहात झालेल्या चर्चेनूसार श्री.व्ही.एल.अतकुरकर, शिक्षणाधिकारी यांचा कालावधी दिनांक १.८.२००२ पासून दोन वर्षासाठी वाढवून देण्यास आणि

मध्यतंराच्या कालावधीत नविन शिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती झाल्यास त्यांना रूजू करून घेण्यांस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९८/३:**

दिनांक १०-०२-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा ठराव क्र.१०७ अन्वये सन २००४-२००५ या वित्तीय वर्षासाठी महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता कराचे दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ९ मधील कलम ९९ अन्वये महानगरपालिकेने दि.२०-०२-२००४ किंवा त्यापूर्वी निश्चित करणे व मंजूर करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे सन २००४-२००५ या वित्तीय वर्षासाठी खालीलप्रमाणे दर हे करयोग्य मुल्यावर आकारणी करण्यास मंजूरी देवून सर्वसाधारण सभेस शिफारस केली आहे.

महानगरपालिकेचे दर -

सन २००३-२००४ चे प्रचलित दर व सन २००४-२००५ साठी प्रस्तावित सामान्य कर व इतर कराचे दर दर्शविणारा तक्ता.

| अ.क्र. | कराचे नांव | सन २००३-२००४ चे प्रचलित दर व सन २००४-२००५ साठी प्रस्तावित दर | स्थायी समितीने मंजूर केलेले दर |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | करयोग्य मुल्य रूपये दर | करयोग्य मुल्य रूपये दर |
| | | १ ते १००० २३% | १ ते १००० २३% |
| | | १००१ ते १०००० २४% | १००१ ते १०००० २४% |
| | | १०००१ ते २०००० २५% | १०००१ ते २०००० २५% |
| | | २०००१ ते ५०००० ३०% | २०००१ ते ५०००० ३०% |
| | | ५०००१ ते १००००० ३४% | ५०००१ ते १००००० ३४% |
| | | १००००० च्या पूढे ३६% | १००००० पूढे ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>अ ) निवासी वापर - ३%<br>ब ) निवासेतर वापर<br>१ ते ५०००० - ८%<br>५०००१ ते पूढे - १०% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>अ) निवासी वापर - ३%<br>ब ) निवासेतर वापर<br>१ ते ५०००० - ८%<br>५०००१ ते पूढे - १०% |
| ३. | वृक्षकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- २% |
| ४. | अग्निशमन कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- १.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- १.५% |
| ५ | मनपा शिक्षण कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- २% |
| ६ | पथकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- २% |
| ७ | जललाभ कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- १.५% |
| ८ | जलनि:सारण लाभकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- १.५% |
| ९ | मोकळ्या जागेचा कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल. | | |

तसेच राज्य शिक्षण कर,रोजगार हमी कर व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारण्यात येईल.

श्री.भागवत कराड : कोणत्याही प्रकारची कर वाढ करण्यात येवू नये. प्रस्ताव मंजूर करावा.

मा.महापौर : प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००४-२००५ या वित्तीय वर्षासाठी खालीलप्रमाणे दर हे करयोग्य मुल्यावर आकारणी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

सन २००३-२००४ चे प्रचलित दर व सन २००४-२००५ साठी प्रस्तावित सामान्य कर व इतर कराचे दर दर्शविणारा तक्ता.

| अ.क्र. | कराचे नांव | सन २००३-२००४ चे प्रचलित दर व सन २००४-२००५ साठी प्रस्तावित दर | स्थायी समितीने मंजूर केलेले दर |
|---|---|---|---|
| १. | सामान्य कर | करयोग्य मुल्य रूपये दर | करयोग्य मुल्य रूपये दर |
| | | १ ते १००० २३% | १ ते १००० २३% |
| | | १००१ ते १०००० २४% | १००१ ते १०००० २४% |
| | | १०००१ ते २०००० २५% | १०००१ ते २०००० २५% |
| | | २०००१ ते ५०००० ३०% | २०००१ ते ५०००० ३०% |
| | | ५०००१ ते १००००० ३४% | ५०००१ ते १००००० ३४% |
| | | १००००० च्या पूढे ३६% | १००००० पूढे ३६% |
| २. | साफसफाई कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>अ ) निवासी वापर - ३%<br>ब ) निवासेतर वापर<br>१ ते ५०००० - ८%<br>५०००१ ते पूढे - १०% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर<br>अ) निवासी वापर - ३%<br>ब ) निवासेतर वापर<br>१ ते ५०००० - ८%<br>५०००१ ते पूढे - १०% |
| ३. | वृक्षकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- २% |
| ४. | अग्निशमन कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- १.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- १.५% |
| ५ | मनपा शिक्षण कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- २% |
| ६ | पथकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - २% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- २% |
| ७ | जललाभ कर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- १.५% |
| ८ | जलनि:सारण लाभकर | कोणत्याही करयोग्य मुल्यावर - १.५% | कोणत्याही करयोग्य मुल्यावर- १.५% |
| ९ | मोकळ्या जागेचा कर सामान्य कराच्या दराने आकारण्यात येईल. | | |

तसेच राज्य शिक्षण कर,रोजगार हमी कर व मोठ्या निवासी क्षेत्रावरील कर शासन निर्णयाप्रमाणे व दराप्रमाणे करयोग्य मुल्यावर आकारणी करण्यासही सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९९/४ :**

उप आयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका,सोलापूर यांनी २ पांढरे वाघ (१ नर,१ मादी) देण्याबाद्दल विनंती केलेली आहे. सध्या औरंगाबाद महानगरपालिका प्राणी संग्रहालयाकडे २ नर व ६ माद्या असे एकूण ८ पांढरे वाघ आहेत. त्यापैकी २ पांढरे वाघ (नर + मादी) देण्यास हरकत नाही.

नंदनकानन प्राणी संग्रहालय भुवनेश्वर ओरिसा यांचे पत्र दि.१४/८/९७ अन्वये त्यांनी त्यावेळी पांढरे वाघाचे किंमत प्रत्येकी रू.५.०० लक्ष दर्शविली असून दोन पांढरे वाघांची किंमत रू.१० लाख होते. परंतू सुप्रिम कोर्टाने वन्यप्राण्यांची अशा प्रकारे किंमत ठरवू नये असे आदेश दिल्यामुळे पांढरे वाघांची किंमत घेता येणार नाही.

तरी सोलापुर महानगरपालिकेस २ पांढरे वाघ द्यावयाचे असल्यास औरंगाबाद महानगरपालिका प्राणी संग्रहालय विकसीत करणे करिता त्यांचे कडून रू. १० लाख रक्कम घेणे योग्य राहील.

सोलापुर महानगरपालिका आयुक्त यांनी त्यांचे दि.७/१/०४ चे अर्धशासकिय पत्रान्वये या रक्कमे मध्ये सवलत मागितली आहे.

तरी सोलापुर महानगरपालिकेस २ पांढरे वाघ द्यावयाचे असल्यास त्यांना औरंगाबाद महानगरपालिका प्राणी संग्रहालय विकसित करणे करिता मा.सर्वसाधारण सभेने ठरविल्याप्रमाणे मागणी करण्यात येऊन २ पांढरे वाघ देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तरी रक्कम निश्चित करणे व २ पांढरे वाघ देण्याबद्दल प्रस्ताव सादर करण्यात येत असून या पुढे औरंगाबाद प्राणी संग्रहालयामध्ये जास्त असलेले प्राणी किंवा एकटे असलेले प्राणी इतर संस्थेस देणे तसेच त्यांची किंमत न ठरविता प्राणी संग्रहालय विकसीत करणे करीता योग्य किंमतीची मागणी करून नियमानुसार आयुक्त यांचे स्तरावर प्राणी देण्या घेण्याचे योग्य निर्णय घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

करिता वरिल प्रमाणे प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

श्री. राधाकृष्ण गायकवाड : मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे वन्य प्राण्यांची किमंत घेता येणार नाही. त्यांचेकडे काही प्राणी असतील जसे गेंडा ई. ते घेण्यांत यावे, व ठरावास मंजूरी द्यावी.

मा.महापौर : मंजूर करण्यांत येते,इतर प्राणी देणे बाबत विचारणा करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मा.सर्वोच्च न्यायालयाने वन्य प्राण्यांची किमंत घेता येणार नाही असे आदेश दिलेले असल्यामूळे किमंत घेता येणार नाही. परंतू इतर अन्य प्राण्यांची देवाण घेवाण करून किंवा प्राणी संग्रहालयाचे विकासा करिता योग्य ती रक्कम घेवून देता येईल. तसेच यापूढेही प्राणी संग्रहालयात जास्त असलेले प्राणी किंवा एकटे असलेले प्राणी इतर संस्थेस देणे त्याबाबत अन्य प्राणी घेणे किंवा किमंत न ठरविता प्राणी संग्रहालयाचे विकासासाठी योग्य ती रक्कम घेवून आयुक्तांचे स्थरावर प्राणी देण्या घेण्याची कार्यवाही करणेस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३००/ ५ :**

सहाय्यक संचालक नगर रचना महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मिळकतधारक श्री. सिताराम भिवसन कांबळे, श्री.जनार्धन देवराव कांबळे व इतर यांची मौजे कांचनवाडी येथील गट क्रमांक ४५ व ४६ ही औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार आरक्षण क्रमांक ०१,०२,०३ व १३ अनुक्रमे प्राथमिक शाळा '' क्रिडांगण '', '' उद्याने '' व '' आरोग्य केंद्र'' तसेच २४ मीटर, १५ मीटर व १२ मीटर रूंद रस्त्याने बाधित आहे. विकास योजना भाग नकाशा सभागृहात अवलोकनार्थ बोर्डावर चिकटविलेला आहे.

मिळकतधारकांनी उपरोक्त आरक्षणे खालील जमिन व विकास योजना रस्त्याने बाधित जमिन संपादन करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सुचना दिनांक २३.१२.२००३ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेस बजावलेली आहे.

उपरोक्त आरक्षणे व रस्ते खालील अंदाजे बाधित क्षेत्र व अंदाजे मोबदला खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्रमांक/रस्ते | बाधित अंदाजे | अंदाजे मोबदला |
|---|---|---|---|
| ०१. | आरक्षण क्रमांक ०१ **'' प्राथमिक शाळा ''** | ०.३६ हेक्टर | रू.१६.७४ लाख |
| ०२. | आरक्षण क्रमांक ०२ **'' क्रिडांगण ''** | ०.५५ हेक्टर | रू.२५.५७ लाख |

| | | | |
|---|---|---|---|
| ०३. | आरक्षण क्रमांक ०३ **'' उद्यान ''** | ०.६० हेक्टर | रू.२७.९० लाख |
| ०४. | आरक्षण क्रमांक १३ **'' आरोग्य केंद्र ''** | ०.२० हेक्टर | रू.०९.३० लाख |
| ०५. | १२ मीटर रूंद रस्ता | ०.२० हेक्टर | रू.०९.३० लाख |
| ०६. | १५ मीटर रूंद रस्ता | ०.०४ हेक्टर | रू.१८.६० लाख |
| ०७. | २४ मीटर रूंद रस्ता | ०.०४ हेक्टर | रू.०१.८६ लाख |
| | | २.३५ हेक्टर | रू.१०९.२७ लाख |

औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीची विकास योजना शासन नगर विकास विभाग यांचेकडील अधि.क्र.टि.पी.एस.३०८८-४५४ सी.आर-५९-८८ नवि-१२ दिनांक १५.१०.१९९१ अन्वये मंजूर होवून दिनांक १९.११.१९९१ पासून अंमलात आली असल्याने दिनांक १८.११.२००१ हा १० वर्षाचा कालावधी पूर्ण झालेला आहे. त्यामुळे मिळकतधारकांची मौजे कांचनवाडी येथील गट क्रमांक ४५ व ४६ पैकीच्या उक्त विकास योजना आरक्षणे व प्रस्तावीत रस्त्याने बाधित क्षेत्रासाठी उपरोक्त कलम १२७ ची खरेदी सुचना लागू होते.

उक्त कलम -१२७ अन्वयेची खरेदी सुचना महानगरपालिकेस दिनांक २३.१२.२००३ रोजी प्राप्त झाल्यामुळे प्राप्त झाल्याचे दिनांकापासून सहा महिन्याच्या आत म्हणजेच दिनांक २२.६.२००४ पूर्वी भूसंपादनाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांचेकडे पाठविणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. नसता उक्त विकास योजना आरक्षणे व प्रस्तावित रस्ते व्यपगत होतील.

करिता प्रकरण कालमर्यादा असल्याने उपरोक्त आरक्षणाखालील व प्रस्तावीत रस्त्याखालील बाधित क्षेत्र संपादन करणेसाठी भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचेकडे जा.क्र./मनपा/नरवि/भूसं/२६७/२००४ दिनांक ३१.०१.२००४ अन्वये पाठविला आहे.

सबब पुढील भूसंपादनाची कार्यवाही होणेस्तव व त्यासाठी भूसंपादन करीता लागणारा वरील प्रमाणे अंदाजे मोबदला खर्चास मान्यता होणेस्तव प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

श्री.भागवत कराड : विषय क्र.५ स्थगीती देण्यात यावी. तसेच विषय क्र.६ सुध्दा स्थगीत करण्यात यावा.

मा.महापौर : विषय क्र.५ स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस सर्वानूमते मान्यता देण्यांत आली.

**विषय क्र. ३०१/६ :**

मुख्य लेखाधिकारी व कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, निर्भय योजनेअंतर्गत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाची थकबाकी अदा करणे बाबत महाराष्ट्र शासन पाणीपुरवठा स्वच्छता विभागाचे शासन निर्णय क्र.निर्भय -१००३/ प्र.क्र.८१/पा.पु.२२/मंत्रालय, मुंबई -३२ दि.२७.११.२००३ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेकडे थकीत असलेली पाणीपुरवठा वरील विलंब आकार तसेच कर्जावरील दंडनिय व्याज माफ़ करणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रस्तावित केलेल्या निर्भय योजनेस उपरोक्त शासन निर्णयाद्वारे मान्यता प्रदान केली आहे. सदरील निर्णयानुसार

निर्भय योजनेच्या वैशिष्टयांतर्गत मुद्दा क्र.६ नुसार थकबाकीदाराकडील अथवा स्थानिक स्वराज्य संस्थेकडील थकबाकीचा ताळमेळ घेऊन अंतीम करून ज्या स्थानिक स्वराज्य संस्था मुळ रक्कम पुर्णत: भरतील त्यांना खालील प्रमाणे विलंब आकारात /दंडनिय व्याजात सवलत देण्यात येईल.

| अ.क | तपशिल | विलंब आकार/दंडनिय व्याज माफ़ीची टक्केवारी | विलंब आकार/दंडनिय व्याज भरावयाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पहिल्या तिमाही अखेर (३१ मे २००४ अखेर) मुळ थकबाकीची रक्कम | योजना सुरू होण्याच्या दिनांकास देयअसलेली विलंबआकाराची / दंडनीय व्याजाची संपूर्ण रक्कम | निरंक |
| २ | दुसऱ्या तिमाही अखेर (३१ ऑगस्ट ०४ अखेर) पुर्ण मुळ थकबाकीची रक्कम भरल्यास | योजना सुरू होण्याचा दिनांकास देय विलंब आकार/दंडनिय व्याज रक्कमेच्या ९० टक्के | १० टक्के |
| ३ | तिसऱ्या तिमाही अखेर (३० नोव्हेंबर ०४ अखेर) मुळ थकबाकीची रक्कम पुर्ण भरल्यास | योजना सुरू होण्याच्या दिनांकास देय विलंब आकार/दंडनिय व्याज रक्कमेच्या ८० टक्के | २० टक्के |
| ४ | चौथ्या तिमाही अखेर (२८ फ़ेब्रुवारी ०५ अखेर) मुळ थकबाकीची रक्कम पुर्ण भरल्यास | योजना सुरू होण्याच्या दिनांकासह देय विलंब आकार/दंडनिय व्याज व्याज रक्कमेच्या ७० टक्के | ३० टक्के |

महानगरपालिकेकडे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाचे पाणी खरेदीपोटी दि.१.१२.२००३ अखेर खालील प्रमाणे रक्कम थकीत आहे.

**आयुर्विमा कर्ज**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुद्दल | रू. | २,८६,५६,७८३/- |
| २. | व्याज | रू. | ३,१५,३९,०१६/- |
| अ) | एकुण | रू | ६,०१,९२,७९९/- |
| | दंडनिय व्याज | रू. | ६८,८१,७९२/- |
| | एकुण | रू. | ६,७०,६७,५८१/- |

खुल्या बाजारातील कर्जे

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुद्दल | रू. | ८६,३६,६१०/- |
| २. | व्याज | रू. | ६,०१,७३,९६३/- |
| ब) | एकुण | रू. | ६,८८,१०,५७३/- |
| | दंडनिय व्याज | रू. | ५,३२,७१,६५०/- |
| | एकुण | रू. | १२,२०,८२,२२३/- |

हडको कर्ज

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुद्दल | रू. | ६१,२९,०१६/- |
| २. | व्याज | रू. | १२,९४,८४९/- |
| क) | एकुण | रू. | ७४,२३,८६५/- |

| | | | |
|---|---|---|---|
| | दंडनिय व्याज | रू. | ३४,३०,८१४/- |
| | एकुण | रू. | १,०८,५४,६७९/- |

महाराष्ट्र जीवन पाणी खरेदी देयके

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुद्दल | रू. | १४२३.३२ लक्ष |
| २. | देखभाल दुरूस्ती खर्च | रू. | ५३.१८ लक्ष |
| ड) | एकुण | रू. | १४७६.५० लक्ष |
| | विलंब आकार | रू. | ६८८५.०१ लक्ष |
| | एकुण | रू. | ८३६१.५१ लक्ष |

औरंगाबाद महानगरपालिकेस सदरील योजनेचा लाभ घ्यावयाचा असल्यास (अ+ब+क+ड) ची एकुण रक्कम रू.२८४०.७७ लक्ष इतका भरणा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयास भरणे क्रमप्राप्त राहील सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता सदरील रक्कम भरणा करावयाची झाल्यास पत संस्थेकडून कर्ज उभारणी करावी लागेल, सद्यस्थितीत बाजारातील व्याज दर अत्यंत कमी असल्यामुळे उपरोक्त रक्कमेचे कर्ज उचलून त्या रक्कमेचा भरणा मंडळाकडे करावा व घेण्यात आलेल्या कर्जाची परतफ़ेड वेळीच व नियमानुसार करणे आर्थिक दृष्ट्या योग्य राहील. सदरील योजने अंतर्गतचा फ़ायदा या महानगरपालिकेने घेतल्यास जवळपास रू.७४८६.५५ लाख विलंब आकार व दंडनिय व्याजात लेखा पडताळणीच्या अधीन राहून सुट मिळू शकेल.

करिता शासन निर्णय क्र.निर्भय -१००३ /प्र.क्र.६८१/पा.पु.२२/ मंत्रालय,मुंबई-३२ दि.२७.११.२००३ निर्भय योजनेमधील अटी शर्तीसह वित्तीय संस्थेकडून कर्ज उभारणी करून एक रक्कमी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधीकरण कार्यालयास भरणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

(सोबत शासन निर्णयाची प्रत अवलोकनास्तव जोडण्यात येत आहे.)

मा.महापौर : प्रस्ताव स्थगित करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस सर्वानूमते मान्यता देण्यांत आली.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ३०२/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी आरोग्य विभाग महापाालकेतर्फ़े बोन डेन्सिटी व मेमोग्राफ़ी शिबीर महिलांसाठी आयोजित करण्यात यावे जेणेकरून याचा लाभ गरीब व गरजू महिलांना घेता येईल.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीस्तव सादर.

सुचक: निखत परवीन एजाज जैदी अनुमोदक: चंद्रभागाबाई दाणे

मा. महापौर : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गेल्या वर्षी प्रमाणे याही वर्षी आरोग्य विभाग महापालिकेतर्फ़े बोन डेन्सिटी व मेमोग्राफ़ी शिबीर महिलांसाठी आयोजित करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०३/ २ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका नियम १९४९ चे कलम ३० (१) अन्वये विविध पाच विषयात समित्यांची महानगरपालिकेने नेमणुक केलेली आहे. या पाच विषयात समित्यांचे सभापतींना स्वतंत्र दालन व कर्मचारी देखील उपलब्ध करून देण्यात आलेले आहे, यापैकी सभापती महिला व बालकल्याण समितीला महानगरपालिकेने वाहन (कार) उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच अमरावती महानगरपालिकेने देखील विशेष समित्यांचे सर्व सभापतींना वाहन उपलब्ध करून दिलेले आहे, त्यांनी त्यांच्या वाहनांनी आपल्या महानगरपालिकेला भेट दिलेली आहे.

सर्वसाधारण सभा ठराव क्र. ४२४/७ दिनांक २०.६.२००१ अन्वये प्रभाग समिती सभापतींना देखील वाहन दिलेले आहे. तरी आता चार विशेष समितीचे सभापतींना महानगरपालिके तर्फे वाहन पुरविण्यात यावे. करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक: भाऊसाहेब वाघ

अनुमोदक: श्री.भरत श्रीपती लकडे, सौ.जयश्री मोरे, सौ. साधना सुरडकर

श्री.भागवत कराड : प्रभाग समित्यांच्या सभापती निवड झाली तेव्हा त्यांना वाहन देण्यात आले व त्या वाहनाचा वापर प्रभाग सभापतींनी करावा व वार्डात कामे होतात की नाही यासाठी वाहन देण्यात आलेले होते. पुन्हा वाहन काढून घेवून काही सभापतींना रू.१०,०००/- महिना दिला जातो. विषय समित्यांच्या सभापतींना वाहन देणार असेल व प्रभाग समित्यांचे सभापती यांना १०,०००/- न देता वाहन देणार असेल तर ते त्यांनी वापर करण्याची गरज आहे.

श्री.राधाकृष्ण गायकवाड : विषय समित्याच्या सभापतींना वाहन देऊ शकतो का ?प्रशासनाने खुलासा करावा.

श्री.सुनिल मगरे : प्रस्ताव स्थगीत करावा.

श्री.भगवान रगडे : विषय समित्याच्या सभापती वापरासाठी वाहन देण्याचा प्रस्ताव असून एकीकडे मनपाची आर्थिक परिस्थिती चांगली नाही. सर्वच सभापती व पदाधिकारी यांना वाहन दिले व त्यावरील खर्च विचारात घेता वाहन देणे बरोबर नाही. फ़क्त ५ पदाधिकाऱ्यांना वाहन देण्यात यावे असे माझे मत आहे. विकास कामे सुध्दा झाली पाहिजे याचा विचार करण्यात यावा.

मा.महापौर : प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांस सर्वानूमते मंजूरी देण्यांत आली.

**विषय क्र. ३०४/ ३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला उस्मानपुरा येथील गोपाल कल्चरल हॉल चौ-रस्ता ते पीर बाजार कडे जाणाऱ्या रस्त्याला **'' स्व. सरदार दलबिरसिंग जबिंदा मार्ग ''** असे नांव देण्याकरिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक: श्री.पांडुरंग तायडे अनुमोदक: श्री.माणिक साळवे

मा.महापौर : प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला उस्मानपुरा येथील गोपाल कल्चरल हॉल चौ-रस्ता ते पीर बाजार कडे जाणाऱ्या रस्त्यास **'' स्व. सरदार दलबिरसिंग जबिंदा मार्ग ''** असे नांव देण्यांस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०५/ ४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, चंपामस्जिद ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या विकास रस्त्यावर पूर्वेकडे (झोपडपट्टी लगत) नाल्याची अंदाजे १५०० ते २००० चौरस फुट जागा आहे. मुख्य रस्त्यावरच ही जागा असल्याने या ठिकाणी अतिक्रमण होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. करिता म.न.पा.ने वाचनालय किंवा बहुउद्देशिय हॉलसाठी या जागेचा वापर करावा. या कामाकरीता सन २००४ - २००५ अर्थसंकल्पात तरतूद देखील ठेवण्यांत यावी. करिता सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव व पूढील कार्यवाहीस्तव प्रस्ताव सादर.

सुचक : सौ.सिद्दीकी नईम सुलताना अनुमोदक : सौ.निखत परविन एजाज अली

मा.महापौर : मंजूर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चंपामस्जिद ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे जाणाऱ्या विकास रस्त्यावर पूर्वेकडे (झोपडपट्टी लगत) नाल्याची अंदाजे १५०० ते २००० चौरस फुट असलेल्या जागेवर महानगरपालिकेने वाचनालय किंवा बहुउद्देशिय हॉलसाठी या जागेचा वापर करण्यास आणि या कामाकरीता सन २००४ - २००५ अर्थसंकल्पात तरतूद करण्यांस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.देखील ठेवण्यांत यावी.

**विषय क्र. ३०६/५ :**

रोशनगेट प्रभागातील आझम कॉलनी येथील जलनि:स्सारण वाहीनी संपूर्णपणे चोकब झाली आहे. किराडपूरा आणि रोशनमस्जीद भागातील ड्रेनेज लाईन देखील याच जलनि:स्सारण वाहीनीमध्ये जोडण्यांत आली आहे. ही जलनि:स्सारण वाहीनी आझमकॉलनी येथील गटारीमध्ये सोडण्यांत आली आहे. आझम कॉलनी ते करीम कॉलनी पर्यंतची गटार संपूर्णपणे गाळ आणि कचऱ्याने भरलेली असल्याने ड्रेनेजचे पाणी पूढे जावू शकत नाही. उलट पाईपलाईन व मेनहोलामध्येच तुंबलेले असते. परिणामी या भागातील विहीरींना आणि बोरींगना ड्रेनेजचे घाण पाणी येत आहे. आझम कॉलनी ते करीम कॉलनी येथील श्री.शेख जिलानी यांच्या घरापर्यंत मोठ्या व्यासाची जलनि:स्सारण वाहीनी टाकण्यासाठी सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात तरतूद केल्यास येथील नागरिकांचा त्रास दुर होईल. करिता सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव व पूढील कार्यवाहीस्तव प्रस्ताव सादर.

सुचक : सौ.सिद्दीकी नईम सुलताना अनुमोदक : सौ.जयश्री मोरे

मा.महापौर :सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आझम कॉलनी ते करीम कॉलनी येथील श्री.शेख जिलानी यांच्या घरापर्यंत मोठ्या व्यासाची जलनि:स्सारण वाहीनी टाकण्यासाठी सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात तरतूद करणेस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच '' जन गण मन'' या राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव

महानगरपालिका,औरंगाबाद.